# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे १
## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०१४ आयोजन
## प्रसिद्धी पत्रक

दिनांक : ०८/१२/२०१४

**परीक्षेचे नांव :-** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा

**परीक्षेचा दिनांक :-** १४ डिसेंबर २०१४

**परीक्षा केंद्रे :-** * जिल्हा मुख्यालयातील विविध शाळा/ महाविद्यालयात परीक्षा केंद्र आहे.

* एकूण परीक्षा केंद्रे :- पेपर I - ८४६

पेपर II - ५१६

**एकूण :-** १३६२

* जिल्हा निहाय केंद्र संख्या सोबतच्या प्रपत्रात आहे.

* सर्व जिल्हा मुख्यालयी परीक्षा घेण्याचे नियोजन आहे.

मात्र रायगड, सिंधुदूर्ग, नंदूरबार या जिल्ह्यामध्ये काही प्रशासकीय कारणामुळे जिल्हा व अन्य तालुका मुख्यालयात परीक्षा केंद्रे आहेत.

* मराठी, इंग्रजी, उर्दू माध्यमातून ही परीक्षा होत आहे.

**परीक्षार्थी संख्या :-**

| अ.क्र. | पेपर क्रमांक | वेळ | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १. | I | सकाळी १०.३० ते १.०० | = २,६०,६१८ |
| २. | II | दुपारी २.३० ते ५.०० | = १,५४,२०० |
| | | **एकूण** | **= ४,१४,८१८** |

**टिप :-** परीक्षार्थींना प्रवेश पत्र ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आले आहेत. परीक्षेच्या वेळेपर्यंत ते उपलब्ध करून घेता येईल.

**परिरक्षक :-** प्रत्येक जिल्ह्यासाठी एक परिरक्षक नियुक्त आहे.

प्रत्येक परीक्षा केंद्रावर परीक्षा साहित्य पोहचविण्याची जबाबदारी झोनल ऑफिसर यांचेवर सोपविण्यात आलेली आहे. चार परीक्षा केंद्रासाठी एक झोनल ऑफिसर नियुक्त करण्यात आलेला आहे.

**जिल्हा नियंत्रण कक्ष :-** प्रत्येक जिल्ह्यासाठी एक या प्रमाणे कक्ष आहे. जिल्हा नियंत्रण कक्षात प्रामुख्याने परीक्षार्थींनी त्यांच्या केंद्राबाबतची बैठक व्यवस्थेची व पत्याची चौकशी केल्यास जिल्हा नियंत्रण कक्षाकडून माहिती देण्याची व्यवस्था केली आहे. परीक्षार्थीने कक्षाकडे विचारणा करावी.

**जिल्हा परीक्षा समिती :-** मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परीक्षा नियोजन व सनियंत्रण समिती असून जिल्हा स्तरावरून परीक्षा आयोजनाची जबाबदारी या समितीवर आहे.

**गैर प्रकार प्रतिबंधक :-** प्रत्येक केंद्रावर बैठे पथक व केंद्रावरील कामकाजाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

सर्व परीक्षार्थी, शैक्षणिक संस्थांचे व्यव्यस्थापक / सर्व शाळा मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी, जिल्हा स्तरावरील अधिकारी व कर्मचारी पोलिस, पत्रकार यांचे सहकार्य अपेक्षित आहे.

सोबत सांख्यिकीय माहितीचा तक्ता जोडला आहे.

**सर्व परीक्षार्थींना शुभेच्छा !!**